**प्रेस नोट २८/०६/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**लोणार पोलीस ठाणे जि.बुलढाणा मनुष्य मिसींग रजि नं.११/१९ मधील मिसींग महिलेचा शोध घेवुन नातेवाईकांचे ताब्यात दिलेबाबत.**

दि.२८/०६/२०१९ रोजी पोउपनिरी.राठोड यांना पोलीस ठाणे येथे दिवसपाळी ठाणे अमंलदार म्हणुन कर्तव्य असताना इसम शंकर दत्तपुरी पुरी,वय-५१ वर्षे,रा.मापारी गल्ली लोणार,ता.लोणार,जि.बुलढाणा यांनी समक्ष पोलीस ठाणे येथ येवुन कळविले की, त्यांची मावस मुलगी,वय-३५ वर्षे,रा.ता.लोणार,ता.लोणार,जि.बुलढाणा ही तीचे पती याचे सोबत झालेल्या घरगुती वादामुळे दि.१६/०६/२०१९ रोजी कोणास काहीएक न सांगता घरातुन निघुन गेलेबाबत लोणार पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसींग रजि नं.११/१९,दि. १७/०६/२०१९ अन्वये मनुष्य मिसींग तक्रार दाखल केलेली आहे.

विवाहित मुलगी ही घरातुन निघुन आल्यानंतर ती पुणे येथ् असलेबाबत एक इसमाने कळविल्याने मुलीचे चुलते व तीचा पती असे तीचा शोध घेण्याकरीता पुणे येथे आले असता ती लेडीज हॉस्टेल नतावाडी,पुणे येथे राहत असल्याचे सांगितल्याने तीस ताब्यात घेतले असुन,ती पती सोबत जायला तयार नाही असे सांगत असल्याने तीला पोलीस ठाणे येथे आणलेले आहे असे सांगितल्याने, पोलीस उप-निरी.राठोड व वपोनि.बाळासाहेब कोपनर यांनी सदर मुलीचे समुउपदेशन केले. त्यावेळी तीने सध्या माझी मानसिक स्थीती बरोबर नाही,मी आता माझे चुलते यांचे बरोबर त्यांचे घरी राहण्यासाठी जाते असे सांगितल्याने तीस चुलते यांचे ताब्यात दिलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी.राठोड यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर